साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–डोमेश्वर शामरावजी शेटे
वय ३० वर्ष, व्यवसाय– मजूरी.
राह. हिंगणा, तह.हिंगणा, जि.नागपूर.

**सरतपासणी अर्जदारातर्फे ॲड श्री.पी.एम.खाटीक यांच्यामार्फत शपथेवर सुरू**

माझे शपथपत्र नि. क्र. २१ मधील मजकुर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे.

मी अभिलेखावर खालील दस्तऐवज दाखल केलेले आहे.

**१७.** मी माझ्या भावाचे सर्टीफिकेट ऑफ लेप्रसीची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केली त्यास **आर्टीकल 'ए'** देण्यात आले, तसेच मी त्याचे रेफरल कार्डची झेरॉक्स प्रत दाखल केली त्यास **आर्टीकल 'बी'** देण्यात आले, तसेच मी त्याच्या ॲडमिशन कार्डची झेरॉक्स प्रत दाखल केली त्यास **आर्टीकल 'सी'** देण्यात आले, तसेच मी माझ्या भावाचे दवा नमुद असल्याची मेडीकल पावती दाखल केली त्यास **आर्टीकल 'डी'** देण्यात आले, तसेच मी माझ्या भावाचे डिस्चार्ज कार्ड दाखल केले त्यास **आर्टीकल 'इ'** देण्यात आले, त्यानंतर मी रविंद्र याचे कंसेशन सर्टीफिकेट दाखल केले त्यास **आर्टीकल एफ** देण्यात आले, त्यानंतर माझ्या भावाच्या तपासणीचा अहवाल मी अभिलेखावर दाखल केला त्यास **आर्टीकल 'जी'** देण्यात आले. त्यानंतर त्याच्या ओ.पी.डी.प्रिस्क्रीपशनची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केली त्यास **आर्टीकल 'एंच** देण्यात आले. त्यानंतर मी लता मंगेशकर हॉस्पीटलचे बिल अभिलेखावर दाखल केले त्या **आर्टीकल 'आय'** देण्यात आले. त्यानंतर मी भरतीची पावती अभिलेखावर दाखल केली त्यास **आर्टीकल जे** देण्यात आले. त्यानंतर मी अभिलेखावर लेबॉरेट्रीच्या रिपोर्टची झेरॉक्स प्रत दाखल केली त्यास **आर्टीकल 'के'** देण्यात आले. त्यानंतर बायोप्सीची पावती अभिलेखावर दाखल केली त्यास **आर्टीकल 'एल'** देण्यात आले. त्यानंतर मी नि.क्र.२३ सोबत १४ ते १९ माझ्या भावाच्या वैद्यकिय उपचाराचे दस्तऐवज (झेरॉक्स प्रति) दाखल केल्या त्यास एकत्रित **आर्टीकल 'एम'** देण्यात आले. त्यानंतर मी माझ्या वडीलाच्या आधारकार्डची व्हेरिफाईड प्रत अभिलेखावर दाखल केली त्यास **नि.क्र.२९** देण्यात आले. त्यानंतर आपसी सोडचिट्टीचा अस्सल लेख मी अभिलेखावर दाखल केला त्यास **आर्टीकल 'एन'** देण्यात आले. त्यानंतर मी मौजा खैरगाव बु. येथील गट क्र.४९

आराजी. ७.६८ हे.आर.च्या ७/१२ उता–याची डिजीटल/ऑनलाईन कॉपी अभिलेखावर दाखल केली त्यास **नि.क्र.३०** देण्यात आला. त्यानंतर मी माझी बहीण प्रणाली हीच्या ॲडमिशनच्या पावतीची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केली त्यास **आर्टीकल 'ओ'** देण्यात आला.

<u>सरतपास संपला.</u>

<u>उलटतपास ॲड.श्री बी.एस.मणे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>

**१८.** अर्जदार सौ.वृशाली डोमेश्वर उर्फ अमोल शेटे ही माझी पत्नी नाही. माझ्या शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे.

**प्रश्न–**अर्जदार क्र.०२ निकष हा तुमचा मुलगा आहे काय?

**उत्तर–**होय.

हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र.०१ वृशाली ही लग्न झाल्यानंतर माझ्या घरी माझ्या कुटुंबासोबत व माझ्यासोबत राहत होती. हे म्हणणे खरे नाही की,ज्यावेळेस माझे लग्न झाले त्यावेळेस मी कॉम्प्युटर ऑपरेटर म्हणुन महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीमध्ये नोकरी करिता होतो. माझे शिक्षण बी.कॉम झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी माझ्याकडे नांदत असतांना माझे आई–वडील मला भडकवत होते व तिला शारीरीक व मानसिक त्रास देत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पत्नीला तु पागल आहे, तुझी आईसुध्दा मतीमंद आहे व अश्लील भाषेत शिवीगाळ करित होते व त्यामुळे माझ्या पत्नीची मानहानी होत होती. हे म्हणणे खरे नाही की, लग्णाला आठ लाख रूपये लागलेले आहे त्यामुळे ते तुझ्या आई–वडीलांकडुन आणुन दे असे मी माझ्या पत्नीला म्हणत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी लग्नानंतर माझ्याकडे दोन महिणे नांदली. हे म्हणणे खरे आहे की, सदर कालावधीमध्ये माझ्या पत्नीसोबत माझे शारीरीक संबंध आल्यामुळे ती गरोदर राहीली. हे म्हणणे खरे नाही की,माझ्या पत्नीला बी.पी.चा त्रास असल्यामुळे तिने मला दवाखाण्यात घेउन जा असे म्हटले होते तरीसुध्दा मी माझ्या पत्नीला दवाखाण्यात नेले नाही. हे म्हणणे खरे आहे की,त्यानंतर माझी पत्नी हिला ॲडमिशन करण्यासाठी ति तिच्या माहेरी निघुन गेली होती व त्या ठिकाणी तिने आई–वडीलांकडुन उपचार करून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी तिला म्हटले की, दोन दिवसात तु नांदायला ये नाही तर तुला घरात घेणार नाही. हे म्हणणे खरे नाही की,त्यावेळी मी तीला म्हणालो की, आता यापेक्षाही तुला माझे आई–वडील चांगले वागवणार नाही व मी तुझा नवरा म्हणुन वागणार नाही व त्यावेळी मी असेही म्हटलो की, तुझे

व माझे संबंध संपले आहे व तु माझे आयुष्य बरबाद केले आहे तसेच मी तीला म्हणत होतो की, तु दिवसभर फोनवर बोलते. हे म्हणणे खरे नाही की, मी तिला स्वेटर घालण्यास मनाई करित होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पत्नीवर निरनिराळे आरोप करित होतो व वाद घालत होतो त्यामुळे ती घाबरली व आपल्या माहेरी निघुन गेली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी सोडचिठ्ठी घेण्याकरिता मी तिच्यावर दबाव आणित होतो. हे म्हणणे खरे नाही की, बळजबरीने व बेकायदेशीरपेणे मी माझ्या पत्नीकडुन सोडचिठ्ठीचा लेख लिहुन घेतला.

**१९.** हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी गरोदर असतांना मी व माझे वडील तीच्या माहेरी गेलो व तिला म्हणालो की, सोनोग्राफी करण्यासाठी चल. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मी माझ्या पत्नीच्या माहेरी गेलो त्यावेळी माझ्या पत्नीने मला विचारले की, तुम्ही जबरदस्तीने सोडचिठ्ठीचा लेख कसा काय लिहून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळेस सोनोग्राफी करणा–या डॉक्टरने सांगितले की, माझ्या पत्नीच्या कुशीत बाळ आहे व ते सुरक्षित आहे त्यावेळी माझ्या आईने सांगितले की, ते माझ्या मुलाचे बाळ नाही ते दुस–या व्यक्तीचे आहे व तिने म्हटले की, डी.एन.ए. टेस्ट करा. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आम्ही कबुल केले की, ते माझे बाळ नाही डी.एन.ए. करावी लागेल.

**२०.** हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर दि.२८/०२/२०२२ रोजी मी बेला पो.स्टेशनला गेलो होतो व तेथे म्हणालो की मी माझ्या पत्नीला घेउन जातो परंतु मी तिला घेउन गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, बेला पो.स्टेशनमध्ये माझी पत्नी मला म्हणाली की, मला नांदायला घेउन जाण्यासाठी सहकार्य करावे परंतु मी तिला नांदायला घेउन गेलो नाही त्यामुळे तीने दि.१४/०३/२०२२ रोजी महीला सेल सुभाष नगर, अंबाझरीला तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, महिला सेलमध्ये मी व माझी पत्नी दोघेही हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.१०/०७/२०२२ रोजी माझ्या मुलाचा जन्म झाला त्याबाबत मला अर्जदाराच्या वडीलाने फोन केला होता तरीसुध्दा मी बाळाला पाहण्यासाठी गेलो नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मला कळविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या बाळाला पाहण्यासाठी गेलोच नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराच्या बाळंतपणाचा खर्च तिच्या वडीलांनीच केला होता.

**२१.** हे म्हणणे खरे आहे की, जेव्हापासुन अर्जदार ही तिच्या वडीलांकडे गेलेली आहे तेव्हापासुन मी तिच्या पालणपोषणाचा खर्च केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.०१/११/२०२२ रोजी मला अर्जदाराने तिच्या वकीलांमार्फत नोटीस दिली होती. सदर

नोटीस मिळाल्यानंतर मी अर्जदार क्र.०१ व ०२ यांच्या पालनपोषणाचा खर्च केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दि.२०/११/२०२२ रोजी नोटीसला उत्तर दिले होते. सदर नोटीसचे उत्तर मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. सदर नोटीस का दाखल केले नाही याचे कारण मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर उत्तरामध्ये काही गोष्टी चुकीच्या असल्यामुळे सदर उत्तर मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. सदर उत्तर मी अभिलेखावर दाखल करू शकतो.

**२२.** माझ्याकडे शेती नाही. माझे वडील रोजमजुरी करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा कंपनीमध्ये काम करित असल्याबाबत माझ्या उत्तरामध्ये लिहीले नाही. गट न.१४०/२३/२३ ही शेती माझी नाही. सदर शेती चरणदास महादेव शेटे आणि शामराव महादेव शेटे यांची नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेती माझी आहे. हे म्हणणे खरे नाही की,माझा भाऊ ज्याचे वैद्यकिय कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली तो भाजीपाल्याचा धंदा करतो. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, माझा भाऊ कुष्टरोगाने ग्रस्त आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहीण प्रणाली ही बी.कॉम होउन नोकरी करते. हे म्हणणे खरे नाही की, मी नोकरी करित असल्यामुळे मला ३०,०००/–रू महिणा पगार मिळतो. मी माझे आई–वडील व भाऊ यांच्यावरचा खर्च रोजमजुरीतुन करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे आई–वडील व भाऊ यांच्यावरचा खर्च रोजमजुरीतुन करतो हे मी खोटे सांगत आहे.

**प्रश्न–**एखाद्या मुलीला लग्न झाल्यानंतर तिच्या नव–यापासुन मुल झाले तर त्याची जबाबदारी तिच्या नव–यावर असते बरोबर आहे काय?

**उत्तर–**होय.

**प्रश्न–**लग्नानंतर मुलीच्या खर्चाची जबाबदारी तिच्या आई–वडीलांवर नसते काय?

**उत्तर–**ज्यावेळेस माझी पत्नी माझ्याकडे लग्न करून आली त्यावेळेस तिच्या पालणपोषणाची जबाबदारी माझ्यावर आहे परंतु ज्यावेळेस ती तिचे सामान घेउन माझे घर सोडुन गेली त्यावेळेस तिच्या पालणपोषणाची जबाबदारी माझ्यावर नाही.

**२३.** हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र.०१ ही माझी पत्नी व अर्जदार क्र.०२ हा माझा मुलगा असल्यामुळे त्यांच्या पालणपोषणाची जबाबदारी माझी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे प्रॉपर्टी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई–वडील,भाऊ हे स्वत:चे पालणपोषण करण्यास सक्षम आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई–वडील व भाउ हे माझे वारसदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला अर्जदार यांना पालणपोषणाचा खर्च द्यावा

लागु नये म्हणुन मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व खोटे बयाण दाखल केले आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

| | |
|---|---|
| वा.दा.ब.अ.सा. | समक्ष |
| (आर.एस.मानकर)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड<br>दि०१.०३.२०२५ | (आर.एस.मानकर)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड |